लोकसत्ता
नाशिक वृत्तान्त
८ गुरुवार, ५ नोव्हेंबर २०२६ WWW.LOKSATTA.COM

ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर बागूल यांचे निधन



नाशिक : जिल्ह्यातील ज्येष्ठ साहित्यिक, कादंबरीकार प्रभाकर बागूल (८४) यांचे बुधवारी पहाटे हृदयविकाराने निधन झाले. बागलाण तालुक्यातील अंबासन हे बागूल यांचे जन्मगाव. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेतून मुख्याध्यापक म्हणून सेवानिवृत्त झालेल्या बागूल यांनी ऐतिहासिक लेखन अधिक केले.

'धर्मात्मा' या कादंबरीपासून त्यांनी लेखनाला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी 'राजे शहाजी', 'धर्मवीर संभाजी', 'योगीराज राजे शिवछत्रपती', 'माँसाहेब जिजाऊ', 'महाराणी पुतळा', 'सरनोबत नेताजी पालकर', 'मेवाड सिंदूर महाराणा प्रताप' अशा दीडशेहून अधिक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांना नाशिक सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले. साहित्यायन संस्था सटाणा यांनीदेखील त्यांना पुरस्कृत केले. बागूल यांच्यावर अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

'स्वीकृत'चा तिढा मिटला

भाजपकडून सहा नवीन चेहरे, सर्वच पक्षांकडून नावे निश्चित

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : महानगरपालिकेतील स्वीकृत नगरसेवकपदाच्या निवडीत भाजपमधील नावांचा गोंधळ अखेरपर्यंत कायम राहिला. चर्चेतील अनेक नावे बाजूला सारत भाजपने सहा नवीन चेहऱ्यांना संधी दिली. सत्ताधारी भाजप आणि शिवसेना (एकनाथ शिंदे) यांच्यातर्फे स्वीकृत नगरसेवकपदासाठी एक वर्षाचा कार्यकाळ निश्चित करण्यात आल्यामुळे पक्षातील अनेक पदाधिकाऱ्यांना पुढील काळात संधी मिळण्याची आशा लागून आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे) गटाने मात्र पाच वर्षांसाठी दोन निष्ठावंत पदाधिकाऱ्यांना संधी दिली.

नाशिक महानगरपालिकेची निवडणूक झाल्यानंतर सर्वांचे लक्ष स्वीकृत नगरसेवक म्हणून कोणाची वर्णी लागते, याकडे लागले होते. आपला नंबर लागावा, यासाठी अनेक इच्छुकांनी वरिष्ठांच्या भेटीगाठी घेतल्या. बुधवार हा अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस होता. शिवसेनेकडून (उद्धव ठाकरे) उपनेते दत्ता गायकवाड यांचे पुत्र हेमंत गायकवाड आणि सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष तथा पत्रकार बाबासाहेब गायकवाड यांची नावे आधीच निश्चित झाली होती. पक्षाकडून तसे पत्र मनपा आयुक्तांना सादर करण्यात आले. ठाकरे गटाच्या खेळीमुळे एक गटनोंदणी केलेल्या काँग्रेसचा हिरमोड झाला. भाजप काँग्रेसच्या काही नगरसेवकांना हाताशी धरून स्वीकृत नगरसेवकांसाठी सात नावे देण्याच्या विचारात होती. परंतु, त्यास यश आले नसल्याचे सांगितले जाते.

भाजपमध्ये अनेकांना धक्का

भाजपमध्ये स्वीकृत नगरसेवक पदासाठी प्रचंड स्पर्धा होती. संभाव्य यादीत अनेक नावांची चर्चा होती. परंतु, अखेरीस चंद्रशेखर पंचाक्षरी, संदीप लेनकर, हेमंत धात्रक, रामहरी संभेराव, रोहिणी नायडू आणि अजित चव्हाण यांची नावे निश्चित झाली. नव्या चेहऱ्यांना संधी देत पक्षाने अनेक इच्छुकांना धक्का दिला. या निवडीवर नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन आणि मंत्री पंकजा मुंडे यांचा प्रभाव राहिल्याचे पक्षाच्या वर्तुळात बोलले जाते. महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारी न मिळालेले, उमेदवारी मिळूनही पराभूत झालेले अशा अनेकांसाठी महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून पोहचण्याचा मार्ग म्हणून 'स्वीकृत'कडे पाहिले जाते. ठाकरे गटाने काँग्रेससह गटनोंदणी केली असली तरी दोन्ही जागा आपल्याच पक्षाकडे राहतील, हे पाहिले.

भाजप आणि शिंदे गटातही स्वीकृत नगरसेवकपदी वर्णी लागावी म्हणून प्रचंड चुरस होती.

नाराजांना शांत करण्यासाठी एक वर्षाचा तोडगा

तौलानिक संख्याबळाच्या आधारे शिवसेना (एकनाथ शिंदे) गटाचे दोन स्वीकृत नगरसेवक राहणार आहेत. यासाठी ७४ जण इच्छुक होते. यामध्ये उमेदवारी मिळालेले आणि न मिळालेले यांची यादी करण्यात आली. त्यातून ३० नावांची यादी तयार झाली. पक्ष प्रमुखांनी सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत



लवटे आणि विधानसभा क्षेत्र प्रमुख बाबुराव आढाव यांच्या नावांवर शिक्कामोर्तब केल्याची माहिती पक्षाचे गटनेते अजय बोरस्ते यांनी दिली. भाजप आणि शिंदे गटाकडून एक वर्षासाठी संधी दिली जाणार आहे त्यामुळे शिंदे गटाच्या आठ पदाधिकाऱ्यांना संधी मिळणार आहे. नाराजांचे ताबूत शमवण्यासाठी भाजप आणि शिवसेनेने एक वर्षाचा तोडगा काढल्याची चर्चा आहे.



दिवाळीनिमित्त मेनरोड, रविवार कारंजा, दहीपूल बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांनी केलेली गर्दी. (छायाचित्र- यतीश भानू)

दिवाळीमुळे बाजारपेठेत तुडुंब गर्दी

बेशिस्त रिक्षाचालकांमुळे वाहतूक कोंडीत भर

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : दिवाळी सणाला गुरुवारपासून वसुबारसने प्रारंभ होत आहे. त्यामुळे बुधवारी शहरातील बाजारपेठांमध्ये खरेदीचा उत्साह शिगेला पोहोचला. दिवाळीसाठी कपडे, पूजा साहित्य, सजावटीच्या वस्तू आणि फराळ साहित्याच्या खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये एकच गर्दी झाली. विशेषतः शहरातील मेनरोड परिसरात ग्राहकांची प्रचंड गर्दी आहे. गर्दीतही रिक्षाचालकांची मनमानी, वाहनांची वाढती वर्दळ यामुळे नागरिकांना मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे.

मेनरोड परिसरातील कपड्यांची दुकाने ग्राहकांनी गजबजली. कुटुंबासह खरेदीसाठी बाहेर पडणाऱ्यांची संख्या वाढली आहे. कपड्यांच्या खरेदीबरोबरच लक्ष्मीपूजनाचे साहित्य, पणत्या, समया, रांगोळी, आकाशकंदील, तोरण, फुलांच्या माळा आणि सजावटीच्या वस्तूंनाही मागणी आहे.

वाहनचालकांची कसरत

वाढत्या गर्दीचा सर्वाधिक फटका वाहतुकीला बसत आहे. मेनरोड, शालिमार, रविवार कारंजा, दहीपूल या भागात खरेदीसाठी गर्दी होते. या ठिकाणी व्यावसायिकांची संख्या अधिक असून काहींनी रस्त्यावरच दुकाने थाटली. लोक रस्त्यावरच्या दुकानाजवळ थांबतात. वस्तू पाहतात. काही खरेदीसाठी भाव कमी करण्यासाठी वाद घालतात. यामुळे वाहतूक खोळंबा होत आहे. काही रिक्षाचालकांकडून प्रवासी घेण्यासाठी रस्त्याच्या कडेला तसेच गर्दीच्या ठिकाणी मनमानी पद्धतीने रिक्षा उभ्या केल्या जात असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. परिणामी वाहनचालकांना मार्ग काढताना कसरत करावी लागत आहे. बाजारपेठेतील गर्दी लक्षात घेऊन वाहतूक पोलिसांनी अधिक प्रभावी नियोजन करावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. रविवार कारंजा परिसरात रिक्षाचालकांची मनमानी कायमच असते. वाहतूक पोलीस याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नाशिककरांकडून केला जातो.

प्रमुख सात मार्गांवर वाहनांना बंदी

मुख्य बाजारपेठेत होणारी नागरिकांची गर्दी आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शहर वाहतूक शाखेतर्फे कार्यवाहीला सुरुवात केली आहे. ११ नोव्हेंबरपर्यंत मध्यवर्ती बाजारपेठेतील प्रमुख सात मार्ग वाहनविरहीत घोषित केले असून सकाळी १० ते रात्री १० या वेळेत सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद राहणार असल्याची माहिती पोलीस उपायुक्त चंद्रकांत गवळी यांनी दिली . वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करण्याचे आवाहन वाहतूक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

GRIHUM

गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : ६वा मजला, "बी" बिल्डिंग, गंगा टूईनो, लोहेगाव, पुणे-४११०१४, महाराष्ट्र.

परिशिष्ट IV (रुल ८(१) पाहा) **ताबा सूचना** (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, "गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"चे, यापुढे वरील कॉर्पोरेट/नोंदणीकृत कार्यालयाचे सुरक्षित धनको म्हणून संदर्भित, प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यापुढे "उक्त ॲक्ट" म्हणून संदर्भित) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ३ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३ (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता खालील ऋणकोंवर फर्मावणारी खालील दिनांकित मागणी सूचना निर्गमित केली आहे.
ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणको तसेच आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी याखाली नमूद केल्यानुसार तारखांदिवशी सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२च्या उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३ (४) अंतर्गत त्याला/तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.
विशेषकरून ऋणको तसेच आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार रक्कम व त्यावरील व्याजासह सुरक्षित धनकोच्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.
सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८) च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत. ताबा घेतलेल्या मालमत्तेचा तपशील याखाली देण्यात आला आहे.

अ. क्र.	ऋणकोंची नावे	मालमत्तेचे वर्णन	ताबा घेतल्याची तारीख	सांविधिक मागणी सूचनेची तारीख	मागणी सूचनेमधील रक्कम (रु.)
१.	वासिम मुक्तार सय्येद/ सुमैय्या मुस्तफा सय्येद/ शकिला मुक्तार सय्येद/ मुस्तफा मुक्तार सय्येद	पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - मालमत्ता धारण केलेला डुप्लेक्स रो हाऊस नं. ०२, असलेला प्लॉटेड एरिआ मोजमापाचा ६१.१२ चौ.मी. व बिल्ट-अप एरिआ मोजमापाचा ११५.१३ चौ.मी. म्हणजेच १२३९.५० चौ.फू., "विजय नगर रो हाऊस" म्हणून ज्ञात असलेल्या बिल्डिंगमधील, प्लॉट नं. २० ते २५ यावर बांधकाम केलेले, असलेला एकूण एरिआ मोजमापाचा १८९८.९९ चौ.मी., गॅट नं. ७२/७३/७९ ते ८२ /८४ यापैकी व येथे स्थित - मौझे ओझर, ता. निफाड, जि. नाशिक. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व : ७.५० मी. रोड, पश्चिम : लगतचा गॅट नं. ६९, दक्षिण : ९ मी. रोड, उत्तर : लगतचा गॅट नं. ७४ व ७५. डुप्लेक्स रो हाऊस नं. ०२ - पूर्व : मार्जिनल स्पेस, पश्चिम : रोड, दक्षिण : रो हाऊस नं. १, उत्तर : रो हाऊस नं. ३.	३१.१०.२०२६	०९.१०.२०२५	लोन नं. HL00627100000005028066 रु. २७५३३८६/- (रुपये सत्तावीस लाख त्रेपन्न हजार तिनशे शहाऐंशी फक्त) वसूलीपर्यंत प्र. व. १२.८५% दराने व्याजासह ०९/१०/२०२५ रोजीप्रमाणे देय

जर कोणत्याही बाबतीत स्थानिक भाषेतील प्रसिद्धी व इंग्रजी वृत्तपत्राच्या प्रसिद्धीतील मजकुरात कोणतीही विसंगती आढळून आल्यास, "दि इंडियन एक्स्प्रेस" या इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली जाहीरात ग्राह्य धरण्यात येईल.

दिनांक : ०५.११.२०२६ स्थळ : नाशिक

स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

आयुक्तांसह तिघांना जामीन

मालेगाव : प्रलंबित देयके मंजूर करण्यासाठी ८० हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी अटकेत असलेले महापालिकेचे तत्कालीन आयुक्त रवींद्र जाधव, स्वीय सहायक नीलेश पाटील आणि लेखापाल हरिश डिंबर या तिघा संशयितांना अपर जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्या. एम. ए. भोसले यांनी बुधवारी जामीन मंजूर केला.

punjab national bank ...the name you can BANK upon !

एआरएमबी मुंबई शहर
यू.बी.आय टॉवर, ६वा मजला, २५, सर पी.एम रोड, फोर्ट, मुंबई-४००००१
ईमेल: cs6041@pnb.bank.in

तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठीची विक्री सूचना सरफेसी कायद्यांतर्गत

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या नियम ८(६)च्या तरतुदीसह वाचून, सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार(रां) व जामीनदार(रां)ना सूचना देण्यात येत आहे की, सुरक्षित कर्जदात्याकडे गहाण ठेवलेल्या/ भार लावलेल्या, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता, ज्यांचा रचनात्मक/ भौतिक/ प्रतिकात्मक ताबा बँकेच्या/ सुरक्षित कर्जदात्याच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, त्या मालमत्ता, संबंधित कर्जदार व जामीनदारांकडून बँकेला/ सुरक्षित कर्जदात्याला देय असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, खालील तक्त्यात नमूद केलेल्या तारखेला "जशी आहे तशी", "जे काही आहे तशी" आणि "जे काही असेल ते" या तत्त्वावर विकल्या जातील. संबंधित मालमत्तांसाठी राखीव किंमत आणि बयाणा रक्कम खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे असेल.

सुरक्षित मालमत्तेचे शेड्युल

अनु. क्र.	कर्जदाराचे नाव, (संस्था/ कंपनी) सह-कर्जदार/ मालक/ भागीदार/ संचालक/ जामीनदार/ गहाण ठेवणार	गहाण ठेवलेल्या स्थावर मालमत्तेचा तपशील/ मालकाचे नाव (मालमत्ता गहाण ठेवणारे)	अ) सरफेसी ॲक्ट २००२च्या अंतर्गत कलम १३(२) अन्वये मागणी सूचनेचा दिनांक. ब) कलम १३(२) नुसार थकीत रक्कम + व्याज आणि शुल्क क) सरफेसी कायदा २००२च्या अंतर्गत कलम १३(४) अन्वये ताब्याची तारीख ड) ताब्याचे स्वरूपः प्रतिकात्मक/ भौतिक/ रचनात्मक	१) राखीव किंमत ब) अनामत रक्कम (अनामत रक्कम जमा करण्याची अंतिम तारीख) क) बोली वाढीची रक्कम	ई-लिलावाची तारीख/ वेळ	सुरक्षित धनकोंना ज्ञात असलेला बोज्याचा तपशील	प्रॉपर्टी आयडी QR कोड
३१	एआरएमबी मुंबई शहर मे. स्पायडर फॅसिलिटिज प्रा. लि. (कर्जदार) श्री. विक्रम माधव तेलंग श्रीमती प्रतिभा विक्रम तेलंग	तळघर परिसर क्रमांक २, कॅनडा टॉवर अपार्टमेंट, प्लॉट क्रमांक १५, सॅन इन्फोटेकच्या खाली आणि सारस्वत बँकेच्याजवळ, कॉलेज रोड, शरणपूर त्र्यंबक लिंक रोड, कॅनडा कॉर्नर, शरणपूर गावठाण, नाशिक, महाराष्ट्र-४२२००५	अ) १४.०३.२०२३ ब) २८.०२.२०२३ रोजीनुसार रु. १,३९,१३,२४५.९४ + भविष्यातील व्याज आणि इतर खर्च क) दिनांकितः ०८.०८.२०२३ ड) प्रत्यक्ष	अ) रु. १,०२,५१,०००.०० ब) रु. १०,२५,१००.९९ २६.११.२०२६ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) क)रु. २५,०००.००	२६.११.२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी ४.००	माहीत नाही	

अटी आणि शर्ती
१. ही विक्री, सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम २००२ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तींच्या आणि खालील अतिरिक्त अटींच्या अधीन असेलः
२. मालमत्ता "जशी आहे तशी", "जे काही आहे तशी" आणि "जे काही असेल ते" या आधारावर विकल्या जात आहेत.
३. वरील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या तारण मालमत्तेचा तपशील अधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद करण्यात आला आहे, परंतु या घोषणेतील कोणत्याही त्रुटी, चुकीच्या विधानासाठी किंवा वगळण्यासाठी अधिकृत अधिकारी जबाबदार राहणार नाही.
४. विक्री ही खाली सही करणाऱ्या व्यक्तीद्वारे, वर नमूद केल्याप्रमाणे https://baanknet.com या वेबसाइटवर दिलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे केली जाईल.
५. विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी, कृपया www.baanknet.com आणि www.pnbindia.in पहा.
६. संपर्क व्यक्ती श्री. सुशील कुमार- ८४२०१९४६७४, श्री. पवन गुडधे- ९४२३७४३११०
७. वरीलपैकी कोणत्याही आयपीसाठी बोली लावणाऱ्या बोलीदाराने, निश्चित राखीव किंमतीव्यतिरिक्त नमूद केल्यानुसार किमान वाढीव रक्कम जोडून बोली लावावी लागेल.
टीपः याव्यतिरिक्त, केंद्र सरकार/ राज्य सरकार/ कोणत्याही वैधानिक संस्थेची कोणतीही वैधानिक देयके आयपीच्या खरेदीदाराने भरायची आहेत, बँक कोणत्याही प्रकारची देयके (भूतकाळातील/ वर्तमानातील/ भविष्यातील) सहन करणार नाही.

सरफेसी कायदा, २००२च्या नियम ८(६) अंतर्गत १५ दिवसांची वैधानिक विक्री सूचना

दिनांकः ०५.११.२०२६
ठिकाणः नाशिक

सही/-
अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक

नोएडातील महालात दोन कोटींचे झुंबर, नाशिकमध्ये २५ कोटींचे रेस्ट हाऊस!

रोहित पवार यांचे नाशिकच्या अधिकाऱ्यांवर आरोप

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



गोदावरीतील अस्वच्छतेची पाहणी करताना आमदार रोहित पवार.

नाशिक : राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार रोहित पवार यांनी सिंहस्थ कुंभमेळा कामांची पाहणी करीत स्थानिक पुरोहितांसह नागरिकांशी संवाद साधला. कुंभमेळ्याच्या कामांची माहिती देण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले. एकाने थाटलेली हॉटेल्स, दुसऱ्याने नोएडात उभारलेला महाल आणि त्यातील दोन कोटींचे एकेक झुंबर, तर अन्य एकाने नाशिकमध्ये २५ कोटींचे गेस्ट हाऊस उभारल्याकडे लक्ष वेधत आमदार पवार यांनी कुंभमेळा कामात प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांनी पारदर्शकता राखली नसल्याचा आरोप केला.

आमदार पवार यांनी स्पष्टपणे नामोल्लेख टाळल्याने नोएडात महाल बांधणारा अधिकारी कोण, याची चर्चा राजकीय व प्रशासकीय वर्तुळात सुरू झाली. कुंभमेळा कामांसंबंधीची माहिती आपण नाशिकच्या कुंभमेळा प्राधिकरणासह अनेक विभागांकडे मागितली होती. काही कार्यालयांकडून त्रोटक माहिती प्राप्त झाली असून अनेक अधिकारी ती दडपत असल्याचा आरोप आमदार पवार यांनी केला. कुंभमेळ्याच्या निमित्ताने ३५ हजार कोटींच्या पायाभूत सुविधा उभारणीस आक्षेप नाही. हा निधी गोदावरी स्वच्छता, सांडपाणी प्रक्रिया केंद्र. वीज वाहिन्या भूमिगत करणे यावर खर्च झाला पाहिजे. परंतु तसे घडलेले नाही. नियोजनाअभावी गोदावरीत पाणी नाही. गोदापात्रातील दूषित पाण्याचा भाविकांच्या आरोग्यावर होऊ शकणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. एका अधिकाऱ्याने एक लाख वृक्ष तोडले, कागदोपत्री ३६०० झाडे दाखवली. सीएसआर अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. संबंधिताने नाशिक परिसरात अनेक हॉटेल, रेस्टॉरंट उभारली. संबंधिताकडे अकस्मात इतका पैसा कसा आला, असा प्रश्न पवार यांनी केला.

पाच मिठाई दुकानांचे परवाने निलंबित

नाशिक : अन्न व औषध प्रशासन विभागाच्या वतीने शहरासह जिल्ह्यात दुकानांची तपासणी सुरू आहे. या मोहिमेत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पाच मिठाई दुकानांचे परवाने निलंबित केले.

तपासणीत अन्न सुरक्षा व स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे आढळले. अस्वच्छता, झुरळ तसेच अन्न सुरक्षा व मानके नियमांमधील तरतुदींचे गंभीर उल्लंघन निदर्शनास आले. या कारवाईमध्ये देवळाली कॅम्प येथील मे. सिर्वी स्वीट्स, अशोका मार्ग येथील मे. कृष्णा सागर स्वीट्स, तिडके कॉलनी येथील मे. पंचम स्वीट्स, ओझर बस स्थानकाजवळील मे. साई बिकानेर स्वीट्स, भगूर येथील मे.उत्तम फरसाण ॲण्ड स्वीट्स यांचा समावेश आहे. ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी सुहास मंडलिक, अश्विनी पाटील, प्रतीक भड, ऋतुजा नवले यांनी केली.

केनरा बैंक Canara Bank भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking सिंडिकेट Syndicate

मालमत्ता वसुली व्यवस्थापन (एआरएम) शाखा : सुखवाणी बिझनेस हब, ३रा मजला, नाशिक फाटा चौक, कासारवाडी, पुणे - ४११०३४,
फोन : + ९१ २० २५५११०३४/६३६४९०५१५३/७३५३३७२२६६,
ई-मेल : cb5208@canarabank.com

ई-ऑक्शन विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि त्यासह वाचण्याच्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील रुल ८ (६) व ९ च्या अटींनुसार स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता ई-ऑक्शन विक्री सूचना
या ठिकाणी सर्वसाधारण जनतेस आणि कर्जदार व जामीनदार यांना विशेषकरुन सूचना देण्यात येते की पुढे नमूद केलेल्या स्थावर / जंगम मालमत्ता ज्या सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण/बोज्याअंतर्गत असून कॅनरा बँक एआरएम शाखेचे अधिकृत अधिकारी यांनी या मालमत्तेचा **ताबा** घेतला आहे, या संदर्भात **कर्जदार** यांच्याकडून कॅनरा बँक, एआरएम शाखा यांना येणे असलेली रक्कम अधिक त्यावरील व्याज आणि आकार वसुल करण्याकरिता सदर मालमतांची विक्री **"जसे आहे, जेथे आहे"** आणि **"जसे आहे, जे आहे"** आणि **"तेथे जे आहे"** या तत्त्वावर खाली नमूद तारखेला करण्यात येणार आहे. फॅक्टरी जमीन व बिल्डींग आणि प्लॅन्ट व मशिनरी यांची एकत्रितपणे एकाच 'लॉट'मध्ये विक्री केली जाईल. केवळ फॅक्टरी जमीन व बिल्डींग यांच्यासाठी भरलेली अनामत रक्कम विक्रीच्या मान्यतेसाठी ग्राह्य धरली जाणार नाही. कोणतेही कारण न देता ई-लिलाव पुढे ढकलण्याचा, रद्द करण्याचा किंवा त्याच्या अटी व शर्तींमध्ये बदल करण्याचा अधिकार अधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवला आहे **स्थावर मालमत्ता, राखीव किंमत यांचा पूर्ण तपशील खालीलप्रमाणे**

• ई-लिलावाची तारीख आणि वेळ तारीख : २५.११.२०२६ रोजी दु. १२.०० ते १.०० वाजेपर्यंत
• बयाणा भरण्याची अंतिम तारीख : २४.११.२०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत • माहित असलेला बोजा : बँकेला माहित नाही.
• मालमत्ता पाहणीची तारीख : दि. १६.११.२०२६ ते २०.११.२०२६ रोजी स.११.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत

अ. क्र.	कर्जदार/गहाणखतदार/ जामीनदारांचे नाव	मालमत्तेचा तपशील	येणे रक्कम	राखीव किंमत / बयाणा रक्कम / ताब्याचा प्रकार	क्यूआर कोड
१.	**श्री. अमृत गोविंद माळी,** फ्लॅट नं. ६१, प्रांजल सोसायटी, वृंदावन नगर, कोणार्क नगर, अडगांव शिवार, अडगांव, नाशिक-४२२००३. **तसेच** : फ्लॅट नं. ०८, ३ रा मजला, जय धनलक्ष्मी आंगन अपार्टमेंट, प्लॉट नं. ०९, गट नं. १९९५/२, ओझर, ता. निफाड, जि. नाशिक-४२२००६. **जामीनदार : श्री. गणेश सुखदेव वानखेडे,** फ्लॅट नं. ७, साई दर्शन अपार्टमेंट, हरी ओम नगर, नाशिक रोड, नाशिक. **तसेच** : वडनेर दुमाळा, वडनेर, नाशिक, ता. आणि जि. नाशिक.	फ्लॅट नं. ०८ चा सर्वसामाईक भाग, ३ रा मजला, बांधकाम क्षेत्रफळ १२३.५१ चौ.मी., 'जय धन लक्ष्मी आंगन अपार्टमेंट' बिल्डींग, प्लॉट नं. ०९, गट नं. १९९५/२ (६४४), ओझर शिवार, ता. निफाड, जि. नाशिक येथे. **चतु:सीमा : उत्तरेस :** पॅसेज, जिना आणि लिफ्ट, **दक्षिणेस :** बाजूची जागा, **पूर्वेस :** बाजूची जागा, **पश्चिमेस :** लगतचा फ्लॅट नं. ०९.	रू. ६८,९५,४८६.६३ दि. ०५/१०/२०२६ रोजी अधिक त्यावरील व्याज आणि आकार	रू. २६,८०,०००.०० / रू. २,६८,०००.०० / प्रत्यक्ष ताबा	
२.	**सौ. नूतन बाळकृष्ण कुलथे (कर्जदार),** फ्लॅट नं. १८, ए विंग, सर्वेश अपार्टमेंट, जय भवानी रोड, नाशिक-४२२१०१. **श्री. सिद्धार्थ राजेंद्र रणशूर (जामीनदार),** राजनिवास, एकलाहारे रोड, नाशिक रोड, नाशिक-४२२१०१.	पुढील रो हाऊस नं. ९ चा सर्वसामाईक भाग, मौर्य रो हाऊस, प्लॉट नं. ७७, गट नं. ४०३, श्री भैरवनाथ मंदिर आणि रेल्वे ट्रॅकजवळ, एकलाहारे रोड, नाशिक रोड, नाशिक-४२२१०५. **चतु:सीमा : पूर्वेस :** स.नं. ५४४/१, **पश्चिमेस :** रस्ता, **उत्तरेस :** प्लॉट नं. ३, **दक्षिणेस :** प्लॉट नं. १.	रू. ३६,५०,०९२.१५ दि. ०५/१०/२०२६ रोजी अधिक त्यावरील व्याज आणि आकार	रू. १८,८०,०००.०० / रू. १,८८,०००.०० / प्रत्यक्ष ताबा	

ई-लिलावाच्या सविस्तर अटी आणि शर्ती **www.canarabank.com** किंवा **www.baanknet.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी शाखेशी संपर्क साधावा.

दिनांक : ०४/११/२०२६,
स्थळ : पुणे

(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

अधिकृत अधिकारी,
कॅनरा बँक

आशा स्वयंसेविकांचे आंदोलन

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने; मोबदल्यात अपेक्षित वाढ न मिळाल्याने संताप

लोकसत्ता प्रतिनिधी



जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करताना आशासेविका.

नाशिक : महाराष्ट्रातील आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांच्या प्रलंबित मागण्यांची तातडीने पूर्तता करावी, राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या २०२६-२७ वर्षासाठीच्या मंजूर कृती आराखड्यातील मोबदला कपात रद्द करावी, आशा व गटप्रवर्तकांना भाऊबीज भेट द्यावी, पीएफ, ईएसआय आणि इतर सामाजिक सुरक्षा लाभ लागू करावेत, या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते आशा गटप्रवर्तक संघटना आयटकच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

केंद्र सरकारने २०१८ पासून आशा व गटप्रवर्तकांच्या मोबदल्यात अपेक्षित वाढ केलेली नाही. त्यातच राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या २०२६-२७ वर्षाच्या मंजूर कृती आराखड्यात ग्राम आरोग्य पोषण दिन, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, आयर्न सुक्रोज, आभा कार्ड, लसीकरण सत्र उपस्थिती यांसह विविध कामांचा मोबदला शून्य केला आहे. गटप्रवर्तकांचे प्रवास भत्ते आणि सॉफ्टवेअर भत्त्यात कपात केली आहे. ही कपात तातडीने रद्द करून मोबदला पूर्ववत करण्याची मागणी केली.

अशा आहेत मागण्या...

आशा व गटप्रवर्तकांना शासकीय कर्मचारी दर्जा देऊन नियमित वेतनश्रेणी लागू करावी, गटप्रवर्तकांना राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांप्रमाणे समायोजित करावे, सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे करावे, पेन्शन, भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, ग्रॅच्युइटी, प्रसूती रजा, आरोग्य व अपघात विमा लागू करावा, किमान वेतनाचा कायदेशीर लाभ द्यावा, दर महिन्याच्या १० तारखेपूर्वी संपूर्ण मोबदला द्यावा, थकीत देयके त्वरित द्यावेत, तसेच अतिरिक्त कामासाठी स्वतंत्र मोबदला द्यावा, अशा मागण्याही आंदोलनात आशा सेविकांकडून यावेळी करण्यात आल्या.

'आयटक'चा इशारा

शासनाने निर्णय न घेतल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा 'आयटक'ने दिला. मागण्यांची पूर्तता न झाल्यास काळी दिवाळी साजरी करण्याचा निर्धार व्यक्त केला. आंदोलनात 'आयटक'चे राज्य अध्यक्ष राजू देसले, जिल्हाध्यक्षा सुरेखा खैरनार, नाशिक अध्यक्षा कांचन पवार, सचिव संगीता सुरंजे यांच्यासह आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.